# अर्जाचा नमुना

**अर्जाचा कार्यालयीन क्रमांक** :-

पासपोर्ट
साईज फोटो

**प्रति,**
मा.उपविभागीय अधिकारी, तथा
अध्यक्ष उपविभागीय स्तरीय समिती,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,किनवट,जि.नांदेड.

१. संपुर्ण नाव आडनांव स्वत:चे नांव वडीलाचे/पतीचे नांव
मराठीत----------------------------------------------------
इंग्रजीत----------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह)
मराठीत----------------------------------------------------
------------------------------------------------------------

३. दुरध्वनी क्रमांक ई-मेलआयडी मोबाईल क्रमांक

खालील पैकी लागू असलेल्या ठिकाणी ( ) अशी खुण करावी.

४. लिंग (पुरुष/स्त्री)

---

५. अ) अर्जदाराची जन्मतारीख(आकडयात) दिनांक महिना वर्ष

------------------------

ब) दिनांक ०१/०१/२०१० रोजी होणारे पुर्ण वय दिनांक महिना वर्ष

------------------------

(अक्षरात)

६. वैवाहिक स्थिती (विवाहित/अविवाहित)

७. शैक्षणिक अर्हता व अनुभव

| **अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण इ ाालेल्या परीक्षांचा तपशील)** | **शाळा/तांत्रिक विद्यालय/विद्यापीठ परीक्षा मंडळाचे नाव (शाखा व विषय नमुद करावे.)** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **मिळालेल्या गुणांची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| अ)माध्यमिक शालांत परीक्षा | | | |
| ब) उच्च माध्यमिक परीक्षा | | | |
| क) पदवी/पदव्युत्तर पदवी(सामाजिक शास्त्रे) | | | |
| ड)अतिरीक्त शैक्षणिक अर्हता असेल तर ते विषयासह नमुद करावे | | | |

**पुर्वानुभव**

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **सेवानिवृत्त इ ााले असल्यास से.नि.चा दिनांक** | **संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण आहात काय?** | **इंटरनेट हाताळण्याचे इ ाान आहे काय?** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**टीप** :- पुर्वानुभव असल्यास संबंधित कार्यालयाकडील/संस्थेकडील दाखला जोडणे आवश्यक आहे.

८. अ) ईतर अर्हताः-

ब) संगणक अर्हता :-

जाहीरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून, या अटी व शर्तीचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मी समज घेतली आहे.अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी व बरोबर आहे.या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव माझ्यापाशी आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड /नियुक्ती रद्द होण्यास पात्र राहील. त्याबददल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक :- **अर्जदाराची सही**

स्थळ :-

## <u>जाहीर प्रगटन</u> दिनांक २३.०८.२०१०

## <u>उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट</u>

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) कायदा २००६, व नियम २००८ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय स्तरीय समिती किनवट अंतर्गत वनहक्क समितीच्या स्तरावर कामकाजाच्या मदतीकरीता मानधन तत्वावर **<u>वनहक्क समिती मदतनीस</u>** यांची नियुक्ती करणेकरीता आयुक्त आदीवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्रराज्य पुणे यांचे पत्र क्रं. असं.११०८७ वनका/प्रक्रं.१/का.७/३४२१ दिनांक ८ आक्टोबर २००८ नुसार सुचना दिल्या आहेत. त्यानुसार सदर पदे कंत्राटी पध्दतीने (फक्त एक वर्षासाठी ) भरण्याकरीता मा. जिल्हाधिकारी नांदेड यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रंमाक २०१०/वनहमा/कावी-५५९ दिनांक ०७.०८.२०१० अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार वरील पदे भरण्यासाठी दिनांक **१५/०९ /२०१०** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ग्रामपंचायत कार्यालयाचे नांव | तालुक्याचे नांव | पद संख्या | एकत्रित वेतन | पदाचा कालावधी | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| १ | बोधडी बु. | किनवट | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | किमान एस.एस.सी. उतिर्ण किंवा शासकिय सेवेतुन सेवानिवृत तलाठी/ ग्रामसेवक/ कृषी सहाय्यक/ ईतर कोणीही योग्य, कुशल व सुशिक्षीत व्यक्तीपैकी असु शकेल. जमीन व वनविषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | सिंगारवाडी | किनवट | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |
| ३ | धोगरवाडी | किनवट | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |
| ४ | पार्डी | किनवट | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |
| ५ | भंडारवाडी/ पिपरी | किनवट | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |
| ६ | तांदळा | माहूर | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |
| ७ | दिगडी धा | माहूर | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |
| ८ | मैडकी | माहूर | १ | रु.२०००/- प्रतिमहा | एक वर्षे | वरील प्रमाणे |

९.अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे.

१. शैक्षणिक अर्हता व परीक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व प्रमाणपत्र
२. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला.
३. शासकीय कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.
४. अधिवास प्रमाणपत्र.
५. लहान कुटुंब असल्याचे सोबतच्या **नमुना अ** मधील विहित नमुन्यातील प्रतिज्ञा पत्र आवश्यक आहे.
६. अर्जदार या पदासाठी वैद्यकीय दृष्टया पात्र असणे बंधनकारक आहे. तसे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करावे लागेल.

१. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल.
२. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रदद करण्याचे सर्व अधिकार उपविभागीय अधिकारी,किनवट यांचे राहतील.तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही.
३. ज्या उमेदवाराची अंतिम निवड झाली आहे. त्यांनी ज्या पदासाठी अर्ज भरला आहे. त्या ठिकाणी त्यांना नियुक्ती देण्यात येईल व त्या वनहक्क समितीचे काम पुर्ण झाल्यावर दुस-या वनहक्क समितीच्या मदतीसाठी पाठविल्यास काम करणे बंधन कारक राहील.
४. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने त्याच्या नियुक्तीचा आदेश प्राप्त दिनांकापासुन ०७ दिवसाचे आत पदावर रुजु होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रदद करण्यात येईल. तसेच निवड सूचीतील प्रतिक्षा यादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवाराने स्वखर्चाने रुजु होणे अनिवार्य आहे.
५. मुळ प्रमाणपत्राची खातर जमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात येईल.
६. नियुक्तीनंतर एक वर्ष किंवा नियुक्ती आदेशात नमुद करण्यात येणाऱ्या त्यापेक्षा कमी कालावधी संपल्यानंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल किंवा उपविभागीय अधिकारी,किनवट यांना वाटल्यास कामाच्या गुणवत्तेवर सुध्दा सदर नियुक्ती संपूष्टात आणण्यात येईल.

**विशेष सूचना:-**

१. उमेदवाराने आपले अर्ज मा.उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष निवड समिती उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट या पत्त्यावर दिनांक **१५/०९/२०१०** पूर्वी पोस्टाव्दारे पाठवावेत.सोबतच्या नमुन्यातील अर्ज ए-४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित / हस्तलिखित सादर करता येतील.मात्र खाडाखोडीच्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा लागेल.
२. अर्जावर अर्जदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
३. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळानंतर) प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
४. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे तोंडी परीक्षेला बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
५. भरती प्रक्रियेसंदर्भात न्यायालयीन दाव्याचे कार्यक्षेत्र नांदेड राहील.
६. अनुभव असल्यास तसे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.
७. ज्या उमेदवाराचे अर्ज पात्र ठरतील अशा उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.सदर मुलाखतीचा दिनांक हा स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
८. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने यावे लागेल.
९. अर्जाचा नमुना www.nanded.gov.in या संकेत स्थळावर जाहिरातीसह उपलब्ध आहे.

अध्यक्ष उपविभागीय स्तरीय समिती,
किनवट